# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 20/02/2020 (गुरूवार)
## (सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 4 कि. मी. अंतरावर गुजरखेडी सावनेर येथे दिनांक 19/02/2020 चे 14.00 वा. ते 16:30 वा. दरम्यान अज्ञात आरोपीने मोनीबाबा खुल्या मंदीरातील एक लहान लोखंडी दान पेटीचा कोंडा तोडुन त्या पेटीमधील अंदाजे 3,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– लिखनदास मोतीदास टिकापाचे, वय 43 वर्ष, रा. करवई, ह. मु. गुजरखेडी, ता. सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मेश्राम 9822545169 हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 8 कि. मी. अंतरावर केरडी बसस्टॉप जवळ कन्हान येथे दिनांक 18/02/2020 चे 18.00 वा. ते 18:30 वा. दरम्यान एम.एच–49/ए.आर–4043 क्रमांकाचा ऑटोचा चालक आरोपी याने फिर्यादी नामे– जागेश्वर दारासिंग ओतेकर, वय 24 वर्ष, खंडारा डुमरी यांचे पेट्रोलपंप वरुन 171/–रु.चा पेट्रोल भरुन पैसे न देता तेथुन निघुन गेला. दरम्यान फिर्यादी व त्याचे सोबत असलेल्या पेट्रोलपंप वरील मुलाने त्यांचा मोटरसाकलने पाठलाग करुन काही अंतरावर सदर आरोपी ऑटोचा चालकास थांबवुन फिर्यादीने त्याचे पेट्रोलचे 171/–रु. मागीतले. आरोपी आटो चालकाने व त्याचे ऑटोमध्ये बसलेले तीन साथीदारांनी संगमत करुन फिर्यादी व त्याचे मित्राला शिवीगाळ करुन हातबुक्याने मारहाण करून हातातील कळयाने फिर्यादीचे डाव्या डोळयाचे वरती मारहाण करून जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 324, 323, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राजेन्द्र पाली 9284354630 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर